देशोन्नती दि. 03/02/2023

# पोलीस अधीक्षक यांच्याकडून पोलिस उपनिरीक्षक गोपीनाथ वाघमारे यांचा गौरव

देशोन्नती वृत्तसंकलन...



**दापका (गुं.)** ■ मुक्रमाबाद पोलिस स्टेशन येथील कार्यरत पोलीस उपनिरीक्षक गोपीनाथ वाघमारे यांनी देगलुर, बाऱ्हाळी येथे धाडसी दरोड्यातील गुन्हा उघडकीस आणुन मोलाची कामगीरी केल्याबद्दल मंगळवारी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे नांदेड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन वाघमारे यांना सन्मानित करण्यात आले.

मुक्रमाबाद पोलीस स्टेशनअंतर्गत बाऱ्हाळी येथील शिक्षक कुटुंबाच्या घरावर धाडसी सशस्त्र दरोडा टाकून चोरट्यांनी मोठी रक्कम व ऐवज लपास केला होता. तर दुसऱ्या घटनेत देगलुर शहरातील एका घरावर धाडसी दरोडा टाकून वयोवृध्द महिलेचा खुण करुण मोठा ऐवज चोरुन पसार झाल्याने पोलिस प्रशासनापुढे एक आव्हान होते. या घटनेचे गांभीर्य घेत जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या गुन्ह्यांचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी देगलुर यांच्याकडे दिला होता.

याकामी पोलिस उपनिरीक्षक गोपीनाथ वाघमारे यांनी आपले कौशल्य पणाला लावून सायबर विभाग, सिसीटीव्ही फुटेजच्या मदतीने वेळेत तपास पूर्ण करुन देगलुर व बाऱ्हाळी येथील धाडसी दरोड्यातील सर्व आरोपीला बेड्या ठोकून कौतुकास पात्र ठरले. वाघमारे यांनी बजावलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेत नांदेड येथे मंगळवार रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन वाघमारे, गजानन कागणे याकामी मदत करणारे जमादार माधव मरगेवाड यांचा गौरव करण्यात आला.

# गो-मास घेवून जाणारा ट्रक मांडवी पोलिसांनी पकडला

देशोन्नती वृत्तसंकलन...



**उमरी बाजार** ■ १ फेब्रुवारी रोजी गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती एक ट्रक गोमास घेऊन सारखणीकडून मांडवीकडे येत असल्याची माहिती मिळाल्याने आर्णीकडून भरधाव वेगात येत असलेला ट्रक वर्दळ न पाहता कोणाच्याही अंगावर चालक गाडी टाकण्याचा प्रयत्न करत होता. सिंदखेडचे सपोनी भालचंद्र तिडके यांनी मोठा पाठलाग करून बोथ फाटा येथे त्या ट्रकला थांबविले. मात्र अंधाराचा फायदा घेऊन चालक पसार झाला.

सपोनी जगताप सोबत पोलीस कॉन्स्टेबल श्याम चव्हाण, रवी कोडमवार हे बोथफाटा येथे गेले असता त्यांना ट्रक क्रमांक एम. एच. ३१ एफ सी. ४८६१ या नंबरचा ट्रक आढळून आला. त्या ट्रकवर कोणालाही गोमास तस्करी होत असल्याचे ओळखू न येण्याकरता समोर जय मातादी व मारुती नंदन असे लिहिलेले होते. आतमध्ये पाहणी केली असता ६ टन गोमास २०० रुपये किलो प्रमाणे १२ लक्ष रुपये आणि ट्रक २५ लक्ष रुपयाचा असा एकूण ३७ लक्ष रुपयाचा मांडवी पोलीस स्टेशन येथे आणून ट्रक मालक (अज्ञात) यांचे विरुद्ध मांडवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनी जगताप हे करीत आहेत.